यशवंत

# देगलूर महाविद्यालयात करिअर कट्टा उपक्रमाचे उद्‌घाटन

देगलूर(प्रतिनिधी): महाराष्ट्र राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने देगलूर महाविद्यालयात ऑनलाईन करियर कटा या उपक्रमाचा उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाला. मअलिकडचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग असून मोबाईलच्या माध्यमातून आय. ए.एस.आपल्या भेटीलाफ व उद्योजक आपल्या भेटीला हा विद्यार्थी वर्गास उपयुक्त उपक्रम देगलूर महाविद्यालय मध्ये सुरू करण्यात आलेला आहे.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थी वर्गास केवळ ३६५ रुपयांमध्ये एक वर्ष ऑनलाईन पद्धतीने आय.ए.एस. प्रशासकीय अधिकारी व विषय तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. यासाठी नाव नोंदणीसाठी तसेच युट्यूबवर ऑनलाईन तासिका सुरू करण्यात आलेल्या आहेत. याची सविस्तर माहिती असलेल्या फलकाचे अनावरण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार यांच्या हस्ते संपन्न झाले. विद्यार्थी वर्गाने या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार यांनी केले व स्पर्धात्मक परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी हा उपक्रम दिशादर्शक ठरेल असे मत समन्वयक डॉ. संजय देबडे यांनी नोंदवले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक या उपक्रमाचे समन्वयक डॉ संजय देबडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उद्योजक आपल्या भेटीला या उपक्रमाचे समन्वयक डॉ सुरेश कांशिंदे यांनी परिश्रम घेतले व आभार मानले.

यावेळी लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ बी. आर. कतुरवार , प्रा. ए आर डांगे डॉ. व्यंकट खंदकुरे व ग्रंथपाल साईनाथ शिंदे यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.